**L. A. BILL No. LXXXIX OF 2025.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA SHOPS AND ESTABLISHMENTS (REGULATION OF EMPLOYMENT AND CONDITIONS OF SERVICE) ACT, 2017.

**सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८९.**

**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

२०१७ चा महा.६१. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन ) (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा प्रख्यापित केला होता; (२०२५ चा महा. अध्या. ८.)

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे , पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) अधिनियम, २०२५, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश, “मुख्य अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम १ मधील, पोट-कलम (३) मध्ये,- २०१७ चा महा. ६१.

(१) खंड (क) मधील, “दहा” या मजकुराऐवजी, “वीस” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) खंड (ख) मधील, “दहापेक्षा” या मजकुराऐवजी, “वीसपेक्षा” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (१) मधील, “दहा” या मजकुराऐवजी, “वीस” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम ७ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७ मध्ये,-

(१) पोट-कलम (१) मधील,-

(क) “दहापेक्षा” या मजकुराऐवजी, “वीसपेक्षा” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(ख) पहिल्या परंतुकामधील, “दहा” या मजकुराऐवजी, “वीस” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) पोट-कलम (२) मधील, “दहापेक्षा” या मजकुराऐवजी, “वीसपेक्षा” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) समास टीपेमधील, “दहापेक्षा” या मजकुराऐवजी, “वीसपेक्षा” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १२ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम १२ मध्ये,-

(१) “नऊ” या मजकुराऐवजी, “दहा” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) “पाच” या मजकुराऐवजी, “सहा” हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(३) विद्यमान परंतुक वगळण्यात येईल.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १४ ऐवजी दाखल करणे.

**६.** मुख्य अधिनियमातील कलम १४ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल:-

आस्थापनांमधील कार्यकालयोजन.

“**१४.** आस्थापनांमधील कर्मचाऱ्यांचे कार्यकालयोजन, कोणत्याही दिवशी बारा तासांपेक्षा अधिक असणार नाही.”.

सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६१ याच्या कलम १५ ची सुधारणा.

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम १५ मध्ये, “एकशे पंचवीस तासांपेक्षा” या मजकुराऐवजी, “एकशे चव्वेचाळीस तासांपेक्षा” हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२०२५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ याचे निरसन व व्यावृत्ती.

२०२५ चा महा. अध्या. ८.

**८.** (१) महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२५, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

महाराष्ट्र राज्य हे, भारतातील सर्वाधिक गतिमान अर्थव्यवस्था असलेले राज्य असून, त्यामध्ये, मोठ्या संख्येत कामगार काम करीत असलेली मोठ्या प्रमाणातील औद्योगिक व सेवा क्षेत्रे समाविष्ट आहेत. विविध कामगार कायद्यांन्वये कामगारांचे संरक्षण कायम ठेवण्याची सुनिश्चिती करत असतांना, आर्थिक विकासाला चालना देण्याकरिता छोट्या व्यवसायांवरील अनुपालनाचा भार कमी करण्यासाठी राज्य प्रयत्नशील आहे. कार्यान्वयन लवचिकता व अनुपालनाचा भार कमी करण्यासंबंधीच्या विनियामक सुधारणांमुळे राज्याची आर्थिक वाढ होईल.

२. व्यवसाय सुलभता व जीवन सुलभता याच्याशी संबंधित असणारे विनियम व कार्यपद्धती यांच्या सुधारणेशी अनुरूप, छोट्या आस्थापनांवरील अनुपालनाचा भार कमी करणे आवश्यक आहे असे वाटले. आठवड्यातील कामाच्या अठ्ठेचाळीस तासांच्या निश्चित मर्यादेत बदल न करता, कामाच्या तासांच्या कार्यान्वयन लवचिकतेची तरतूद करणे आवश्यक आहे असे देखील वाटले. वरील प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ (२०१७ चा महा. ६१) यात यथोचित सुधारणा करणे इष्ट आहे, असे शासनास वाटले.

३. सुधारणांची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :—

(क) छोट्या व्यवसायांचा अनुपालनाचा भार कमी करण्याच्या, रोजगार निर्माण करण्यास प्रोत्साहन देण्याच्या आणि अनुपालन न केल्याची भीती दूर करण्याच्या दृष्टीने, नोंदणीसाठी व उक्त अधिनियमाच्या इतर विनियामक तरतुदींसाठी कोणत्याही आस्थापनेतील १० किंवा त्यापेक्षा अधिक असलेली कर्मचाऱ्यांची मर्यादा, २० किंवा त्यापेक्षा अधिक वाढविणे. २० पेक्षा कमी कर्मचारी असलेल्या आस्थापनांनी, सुविधाकारांकडून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करण्याची गरज असणार नाही, परंतु त्यांनी केवळ त्यांच्या व्यवसायाची माहिती देणे गरजेचे असेल. तथापि, त्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या इतर वैधानिक सुरक्षा कायम राहतील ;

(ख) दैनंदिन कामाचे तास, कोणत्याही आठवड्यात जास्तीत जास्त अठ्ठेचाळीस तासांच्या अधीन राहून, विश्रांतीच्या मध्यंतरासह, विद्यमान नऊ तासांवरून दहा तासांपर्यंत वाढविणे. मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार कार्ये निर्माण करणे, रोजगाराच्या संधी वाढविणे आणि कोणत्याही अडथळ्यांशिवाय, आपत्कालीन परिस्थिती, अधिकतम मागणी किंवा कर्मचाऱ्यांची कमतरता या बाबी हाताळण्यासाठी आस्थापनांना लवचिकता देणे, ही, या उपाययोजनेची ध्येये आहेत ;

(ग) आस्थापनेमध्ये दैनंदिन कामाचे तास वाढविल्यामुळे आणि वेळापत्रक अधिक लवचिक ठेवण्याकरिता, कामाच्या तासांचे कार्यकालयोजन, एका दिवसामधील सध्याच्या साडेदहा तासांवरून बारा तासांपर्यंत वाढविणे ;

(घ) कामाच्या दैनंदिन कमाल तासांमध्ये लवचिकता आणण्यासाठी आणि त्यांचे सुलभपणे समायोजन करण्याकरिता, अखंड कामाच्या तासांची कमाल मर्यादा, विश्रांतीच्या मध्यंतराशिवाय, पाच तासांवरून सहा तासांपर्यंत वाढविणे ;

(ङ) एका तिमाहीतील अतिकालिक कालावधी, १२५ तासांवरून १४४ तासांपर्यंत वाढविणे, जेणेकरून अत्यंतिक कामाचा ताण कमी करण्याकरिता आस्थापनांना, प्रत्येक तिमाहीतील वाढविलेल्या कालावधीसाठी कामगारांना अतिकालिक कामात गुंतविण्याची मुभा असेल. या बदलांमुळे, कामगारांची अर्थार्जन क्षमता वाढेल आणि अतिकालिक कामाच्या पद्धतीस औपचारिक स्वरूप देता येईल आणि सर्व अतिरिक्त तासांची योग्य प्रकारे नोंदणी करण्यात येत आहे आणि त्याबद्दल भरपाई दिली जात आहे याची खात्री करता येईल. त्यामुळे, कामगारांच्या पिळवणुकीस प्रतिबंध करण्यास मदत होईल. तथापि, अतिकालिक काम करणे कामगारांवर बंधनकारक असणार नाही.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना ( नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन ) अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्याकरिता, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून त्यांनी दिनांक १ ऑक्टोबर २०२५ रोजी महाराष्ट्र दुकाने व आस्थापना ( नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन ) ( सुधारणा ) अध्यादेश, २०२५ ( २०२५ चा महा. अध्या. ८ ), हा प्रख्यापित केला होता.

५. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विध्येयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक ४ नोव्हेंबर, २०२५.

**आकाश फुंडकर,**
कामगार मंत्री.

## सन २०२५ चे वि. स. वि. क्रमांक ८९ – महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन (सुधारणा) विधेयक, २०२५ याचे परिशिष्ट.

### (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन अधिनयम, २०१७ यातील उतारे)

### (सन २०१७ चा महा. अधिनियम क्रमांक ६१.)

**१.** (१) ते २. * * * * संक्षिप्त, नाव, व्याप्ती, प्रयुक्ति व प्रारंभ

''(३)(क) कलम ७ खेरीज करून, या अधिनियमाच्या तरतुदी, दहा किंवा त्यापेक्षा अधिका कर्मचारी नोकरीवर ठेवणाऱ्या आस्थापनांना लागू असतील.

(ख) कलमे ७ व ३६ क यांच्या तरतुदी, दहापेक्षा कमी कर्मचारी नोकरीवर ठेवणाऱ्या आस्थापनांना लागू असतील.''.

(४) * * * *

**२. ते ५.** * * * *

**६.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून किंवा आस्थापनेने आपला धंदा सुरू केल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत दहा किंवा त्याहून अधिक कर्मचारी काम करीत असलेल्या प्रत्येक आस्थापनेचा मालक, संबंधित स्थानिक क्षेत्राच्या सुविधाकाराकडे नोंदणीकरीता विहित करण्यात येईल असे शुल्क आणि असे स्वयं-घोषणापत्र व स्वयं-प्रमाणित कागदपत्रे यांसह विहित नमुन्यात पुढील बाबींचा अंतर्भाव असलेला अर्ज ऑनलाईन सादर करील :— आस्थापनांची नोंदणी.

(क) मालकाचे व व्यवस्थापक, असल्यास, त्यांचे नाव ;

(ख) आस्थापनेचा टपालाचा पत्ता ;

(ग) आस्थापनेचे नाव, कोणतेही असल्यास ;

(घ) आस्थापनेच्या धंद्याचे प्रत्यक्ष स्वरूप आणि ;

(ङ) विहित करण्यात येतील असे इतर तपशील ;

परंतु, यात वर नमूद केलेली कोणतीही बाब, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम याअन्वये अगोदरच वैध नोंदणी किंवा नूतनीकरण असणाऱ्या आस्थापनांना, त्यांची नोंदणी नूतनीकरण समाप्त होईपर्यंत लागू असणार नाही.

२. ते ५. * * * *

**७.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून किंवा आस्थापनेने धंदा सुरू केल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत दहापेक्षा कमी कर्मचारी काम करत असणाऱ्या प्रत्येक आस्थापनेचा मालक, ज्याच्या अधिकारितेत आस्थापना स्थित असेल त्या सुविधाकारास धंदा सुरू केला असल्याचे विहित नमुन्यात ऑनलाइन अर्ज करून व त्यासोबत विहित करण्यात येईल असे स्वयं-घोषणापत्र आणि स्वयं-प्रमाणित कागदपत्रे यांसह ज्यात मालकाचे, आणि व्यवस्थापकाचे नाव, धंद्याचे स्वरूप, कर्मचाऱ्यांची संख्या आणि विहित करण्यात येईल असा तपशील अंतर्भूत असेल असे सूचनापत्र देईल. सुविधाकार, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व रीतीने सूचनापत्राची पावती अशा आस्थापनेच्या मालकाला देईल. सूचनापत्राच्या पावतीच्या तपशिलाची विहित करण्यात येईल अशा रीतीने व नमुन्यात ठेवलेल्या नोंदवहीमध्ये ऑनलाईन नोंद घेण्यात येईलः दहापेक्षा कमी कर्मचारी नोकरीवर ठेवलेल्या आस्थापनेने द्यावयाचे सूचनापत्र.

परंतु, कोणत्याही वेळी, वरील कोणत्याही आस्थापनेत नोकरीवर ठेवलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या ही दहा किंवा त्यापेक्षा जास्त झाल्यास, अशा आस्थापनेस या अधिनियमाच्या सर्व तरतुदी लागू होतील आणि

अशा आस्थापनेच्या मालकास कलम ६ च्या तरतुदींनुसार नोंदणी करून घेणे बंधनकारक असेलः

परंतु आणखी असे की, या पोट-कलमातील कोणतीही बाब, महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम याअन्वये अगोदरच वैध नोंदणी किंवा नूतनीकरण असणाऱ्या आस्थापनांना, त्यांची नोंदणी किंवा नूतनीकरण समाप्त होईपर्यंत लागू असणार नाही.

( २ ) दहापेक्षा कमी कर्मचाऱ्यांना कामावर ठेवलेल्या अशा आस्थापनेचा मालक, धंदा बंद झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये आणि रीतीने आस्थापना धंद्यासाठी बंद करण्यात आल्याचे सुविधाकारास अधिसूचित करील. सुविधाकार अशी माहिती मिळाल्यावर अशा आस्थापनेची अशा प्रयोजनांसाठी ठेवलेल्या नोंदवहीतून नोंद काढून टाकेल.

( ३ ) * * * *

**८. ते ११.** * * * *

आस्थापनेचे रोजचे व आठवड्याचे कामाचे तास आणि विश्रांतीसाठी मधली सूट.

**१२.** या अधिनियमाच्या इतर तरतुदींना अधीन राहून, कोणत्याही प्रौढ कर्मचाऱ्यास, कोणत्याही आस्थापनेत, कोणत्याही दिवशी नऊ तासांपेक्षा अधिक तास आणि कोणत्याही आठवड्यात अठ्ठेचाळीस तासांपेक्षा अधिक तास काम करण्यास भाग पाडता येणार नाही किंवा त्यास काम करण्याची मुभा देता येणार नाही. कोणत्याही प्रौढ कर्मचाऱ्यास अर्धा तास विश्रांतीसाठी मध्यंतर दिल्याखेरीज पाच तासापेक्षा अधिक कालावधीसाठी खंड न पडता काम करण्यास फर्माविण्यात येणार नाहीः

परंतु, तातडीच्या स्वरूपाच्या कामाच्या बाबतीत सुविधाकाराच्या पूर्वमान्यतेने कामाचे तास किंवा साप्ताहिक सुटी शिथिल करता येईल.

**१३.** * * * *

आस्थापनांतील कार्यकालयोजना.

**१४.** आस्थापनांतील कर्मचाऱ्यांचे कार्यकालयोजन कोणत्याही दिवशी साडे दहा तासांपेक्षा अधिक असणार नाही आणि खंडित स्वरूपाचे काम किंवा तातडीचे काम सोपविलेल्या कर्मचाऱ्यांचे कार्यकालयोजन बारा तासांपेक्षा अधिक असणार नाही.

अतिकालिक काम केल्याबद्दल वेतन.

**१५.** कोणत्याही आस्थापनेतील कर्मचाऱ्यास दिवसाला नऊ तासापेक्षा किंवा आठवड्याला अठ्ठेचाळीस तासांपेक्षा जादा वेळ काम करण्यास भाग पाडण्यात आले तर, त्याबाबत तो अतिकालिक कामाच्या संबंधात त्याच्या नेहमीच्या वेतनाच्या दराच्या दुप्पट दराने वेतन मिळण्यास हक्कदार असेल. एकूण अतिकालिक तास हे तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये एकशे पंचवीस तासांपेक्षा अधिक असणार नाहीत.

**१६. ते ३९.** * * * *

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

**[सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८९]**

**[महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तींचे विनियमन) अधिनियम, २०१७ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.]**

**[श्री. आकाश फुंडकर,**
कामगार मंत्री.]

**जितेंद्र भोळे,**
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, नागपूर.